**नियमित दिवाणी दावा नं. १३५/२००५**
**निशाणी क्रमांक १०६ वरील आदेश**
**सी.एन.आर.क्र. MHK0110009812005**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी तर्फे उलटतपासाकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १८ नियम १७ अन्वये साक्षीसमन्सचा आदेश होणेबाबत दाखल केलेला आहे.

**०२.** प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत दाव्याकामी वादींचा पुरावा संपलेनंतर प्रतिवादींचा पुरावा चालू केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे कामकाज चालू असताना प्रस्तुत वादीने दावा मिळकतीमधील त्यांचा असणारा हिस्सा पवनकुमार खिचडे यांना विक्री केलेला असून त्यांनी विक्रीचा रजिस्टर करार कबुल केलेला आहे. सदरचा विक्री करार प्रस्तुत दावेचे अभिलेखावर प्रतिवादी यांनी दाखल केलेला आहे. प्रतिवादी पुढे कथन करतात की, सदरची बाब वादी यांनी न्यायालयापासून लपवून ठेवलेली असून सदर विक्री कराराबाबत सद्यवस्तुस्थिती न्यायालयासमोर येणे गरजेचे आहे. त्यासाठी वादी व खरेदीदार पवनकुमार धनचंद खिचडे यांचा उलटतपास घेणे गरजेचे आहे. सबब, सदर साक्षीदारांना उलटतपासासाठी पुन्हा साक्षीसमन्स काढणेसाठी प्रतिवादी यांनी मागणी केली आहे.

**०३.** प्रस्तुत अर्जास वादी यांनी त्यांचे म्हणणे निशाणी क्र. १०७ येथे दाखल करून विरोध दर्शविलेला आहे. वादी यांच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज कायद्याने चालण्यास पात्र नाही. प्रस्तुत दाव्याकामी वादींचा पुरावा संपलेला असून प्रतिवादींचा पुरावा देखील संपलेला आहे व तशी पुरावा संपलेची पुरसीस प्रतिवादी यांनी दिनांक २५/०९/२०१७ रोजी निशाणी क्र. ९२ येथे दाखल केलेली

आहे. अशापरिस्थितीत प्रतिवादी यांना प्रस्तुतचा अर्ज दाखल करता येणार नाही. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी केवळ दाव्याची चौकशी पुन्हा सुरू करणेसाठी व प्रस्तुतच्या दाव्याचे काम लांबविण्याच्या दृष्टीने दाखल केला असून तो नामंजूर करणेत यावा अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**०४.** प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील वादी यांचे म्हणणे व संपूर्ण अभिलेखाचे अवलोकन केले. वादीतर्फे विधीज्ञ तसेच प्रतिवादी तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**०५.** प्रस्तुत दाव्यातील अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांना दिनांक ०१/०९/१९९९ रोजी दावा परिच्छेद क्र. १ड मध्ये नमुद मिळकतीचे खरेदीपत्र हे बेकायदेशीर व रद्दबातल आहे असे ठरवून मिळणेसाठी तसेच निरंतर मनाई ताकीदीसाठी दाखल केलेला असून माझे सन्माननिय पुर्वाधिकारी यांनी प्रस्तुत दाव्याकामी निशाणी क्र. २२ येथे दिनांक १९/०८/२००८ रोजी वादमुद्दे निश्चित केले असून त्यानंतर वादी यांचा तोंडी पुरावा दिनांक १०/०८/२०१५ रोजी निशाणी क्र. ६० वरील पुरसीस अन्वये संपलेला असून प्रतिवादी यांचा तोंडी पुरावा निशाणी क्र. ९२ वरील पुरसीस अन्वये दिनांक २५/०९/२०१७ रोजी संपला असल्याचे अभिलेखावरून स्पष्ट होते व त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी दिनांक ०८/११/२०१९ रोजी म्हणजेच जवळ जवळ दोन वर्षांनी दाखल केलेला आहे. प्रतिवादीतर्फे विधीज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना पवनकुमान धनचंद खिचडे यांना खरेदीपत्र करून दिलेले आहे व सदरची बाब ही न्यायालयापासून लपवून ठेवलेली आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता सदरच्या खरेदीपत्राची साक्षांकीत प्रत प्रतिवादी यांनी दिनांक १७/१२/२०१५ रोजी निशाणी क्र. ६९ लगत दाखल केलेली आहे. प्रतिवादी यांनी वादी यांचा उलटतपास हा दिनांक ०१/०८/२०१५

रोजी नोंदविला असल्याचे अभिलेखावरून दिसून येते व वादीचा पुरावा दिनांक १०/०८/२०१५ रोजी संपल्याचे दिसून येते. त्यानंतर सदर खरेदीपत्राची माहिती प्रतिवादी यांना दोन ते तीन महिन्यामध्ये झाल्याचे अभिलेखावरून प्रथमदर्शनी दिसून येते. त्यानंतर तब्बल चार वर्षांनी म्हणजेच प्रतिवादी यांचा पुरावा संपल्यानंतर प्रतिवादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांनी सदरच्या खरेदीपत्राची माहिती झाल्यापासून प्रस्तुत दाव्यातील पुरावा चालू असतानाच प्रस्तुतचा अर्ज का दाखल केला नाही याचे कोणतेही संयुक्तीक कारण अर्जामध्ये नमुद नाही. प्रस्तुत अर्जातील कथनांना आधार देण्यासाठी त्यांचे शपथपत्र देखील दाखल केलेले नाही.

०६. ***दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे क्रम १८ नियम १७ अन्वये दाव्याच्या कोणत्याही टप्याला न्यायालयास ज्या साक्षीदारांची आगोदर तपासणी झालेली आहे अशा कोणत्याही साक्षीदारास पुन्हा साक्षीसाठी बोलविता येईल***.

०७. प्रस्तुत दाव्याकामी वादीतर्फे साक्षीदार क्र. १ यांचा उलटतपास पूर्ण झाल्यानंतर प्रतिवादी यांना दिनांक २७/०६/२०१३ रोजीचे संचकारपत्रकाची माहिती झाली असे प्रतिवादी यांचे कथन आहे. त्यानंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेस प्रतिवादी यांना चार वर्ष लागली. परंतू प्रस्तुत दाव्याचे स्वरूप पाहता व प्रस्तुत दाव्यास अंतिम स्वरूप प्राप्त होण्याच्या दृष्टीने प्रतिवादी यांना वादी उज्वला महाविर चौगुले व खरेदीदार पवनकुमार धनचंद खिचडे यांचा जादा उलटतपास नोंदविण्याची संधी देणे हे न्यायोचित होईल. तसे झाले नाही तर प्रस्तुत दाव्यास अंतिम स्वरूप पाप्त होणार नाही. तसेच प्रकरणांचे बाहुल्य वाढून गुतागुंत देखील वाढण्याची शक्यता आहे. याउपर सदरचा उलटतपास नोंदविलेनंतर वादी यांना सदर दोन्ही साक्षीदार यांचा भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १८७२ चे कलम १३७ अन्वये फेरतपासणी

घेण्याची देखील संधी उपलब्ध आहे. त्यामुळे वादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रस्तुत दाव्याकामी अद्याप अंतिम युक्तीवाद झालेले नाहीत.

०८. परंतू असे जरी असले तरी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास सदर संचकारपत्रकाची माहिती झालेपासून प्रतिवादी यांना जवळ जवळ चार वर्षाचा कालावधी लागलेला आहे. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करणेसाठी त्यांची तत्परता दाखलवलेली नाही. अशापरिस्थितीत प्रस्तुतचा अर्ज मंजूर करत असताना प्रतिवादी यांचेवर प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेसाठी जो विलंब झालेला आहे त्याबाबत खर्च बसवणे हे देखील गरजेचे आहे. त्याचबरोबर वादी यांचा पुरावा संपलेला आहे. यापूर्वी वादीतर्फे साक्षीदार यांच्या उलटतपासाची संधी दिलेली होती. अशापरिस्थितीत प्रतिवादी हे वादीतर्फे साक्षीदार उज्वला चौगुले व पवनकुमार खिचडे यांना पुन्हा उलटतपासासाठी बोलवित आहेत. अशापरिस्थितीत सदर दोन्ही साक्षीदारांच्या साक्षीसाठी येणे–जाणेचा भत्ता दिवाणी नियमावली (Civil Manual) च्या तरतुदीप्रमाणे देण्याची जबाबदारी ही प्रतिवादी यांची असेल. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांचेवर खर्च बसवून तसेच साक्षीदारांचा भत्ता देण्याच्या अटीवर मंजूर करणे न्यायोचित होईल. त्यामुळे न्यायाचा समतोल देखील साधला जाईल. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

## <u>आ दे श</u>

१. प्रतिवादी यांचा प्रस्तुतचा अर्ज रक्कम ₹७००/– खर्च वादी यांना देणेच्या अटीवर मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादी यांनी सदर रक्कम ₹७००/– वादी यांना आदा केलेनंतर वादी उज्वला महादेव चौगुले व पवनकुमान धनचंद खिचडे यांना अर्जातील नमुद पत्यावर उलटतपासासाठी साक्षीसमन्स काढण्यात येईल.

३. प्रतिवादी यांनी दिवाणी नियमावलीचे तरतुदी अन्वये वर नमुद साक्षीदार यांचे साक्षीभत्ते देण्याचे आहेत.

४. वर नमुद साक्षीदार यांचे उलटतपासानंतर वादी यांना त्यांचे फेरतपास घेण्याचा हक्क भारतीय साक्षीपुरावा अधिनियम, १८७२ चे तरतुदींअन्वये राहिल.

Chaitanya Sunildatta Deshpande

Digitally signed by Chaitanya Sunildatta Deshpande
Date: 2021.01.25 16:34:39 +0530

**पेठ–वडगांव.** **( सी. एस. देशपांडे )**

**दिनांक २५/०१/२०२१** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पेठ–वडगांव.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. R. P. Moraskar |
| Name of Court | Shri. C. S. Deshpande Jt. Civil Judge Jr.Dn., Peth-Vadgaon. |
| Date of Dictation | 25/01/2021 |
| Judgment Signed by the P.O. on | 25/01/2021 |
| Judgment uploaded on | 25/01/2021 |